# जय जिजाऊ जयघोषाने दुमदुमले मातृतीर्थ !


जिजाऊ चौक डिजिटल कमानीचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते उद्घाटन

>> पान 2

शरद पवारांकडून दगा-फटक्याचे राजकारण, ठाकरेंचा द्रोह

>> पान 3

केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन

>> पान 4


**सुविचार**

जीवनात मूल्ये जपल्यास खऱ्या अर्थाने यशस्वी होता येते.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 152 ■ सोमवार, दि. 13 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





अरुण गोविल कसे बनले 'रामायण'मधील 'राम'? या व्यक्तीमुळे अजरामर झाला अभिनेता

आतील पान


# राजमाता जिजाऊ यांचा ४२७ वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

## केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते महापुजा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा आज जन्मदिवस असून त्यांच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त सिंदखेड राजा येथील जन्मस्थळी 'राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सुर्योदयावेळी शासकीय महापुजा करण्यात आली.









### शाळकरी विद्यार्थांमध्येही उत्साह

राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यात हजारो जिजाऊप्रेमींची गर्दी होती. या सोहळ्यात शाळकरी मुलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदवला होता. यावेळी मॉ जिजाऊ जन्मोत्सवाचा शाळकरी विद्यार्थांमध्येही उत्साह दिसून येत होता.

पुरातत्व विभाग, नागपूर, सिंदखेड राजा नगरपरिषद आणि मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त कामगार मंत्री ड.आकाश फुंडकर, खासदार सुप्रिया सुळे, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, लखुजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव, माजी आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, शशिकांत खेडेकर जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उपविभागीय अधिकारी संजय खडसे, तहसिलदार, मुख्याधिकारी यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेवून अभिवादन केले.

महापुजा पार पडल्यानंतर केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, सिंदखेड राजा नगरीमध्ये राजमाता जिजाऊ यांचा ४२७ वा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या जन्मोत्सवासाठी दरवर्षीप्रमाणे देशभरातून लाखो लोक राजमाता जिजाऊ यांच्या दर्शनासाठी येत असतात. मॉ जिजाऊ साहेब यांच्या रुप–ाने सिंदखेड राजा नगरीला आदर्श माता, पूत्र घडविणारी राष्ट्रमातेची नगरी म्हणून जगभरात दर्जा प्राप्त झाल्याचे सांगून राजमाता जिजाऊ जयंतीच्या शुभेच्छा व्यक्त केल्या.

### राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा - कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर



राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवानिमित्त कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते शासकीय पुजा करण्यात आली. त्यावेळी ते माध्यमांशी बोलतांना म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सव हे महाराष्ट्रातील भक्तांसाठी दर्शनाची वर्षभराची शिदोरी असते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दर्शन घेण्यासाठी आलो. राजमाता जिजाऊ जन्मोत्सव हा लोकोत्सव व्हावा यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार आहोत. लखुजीराजे जाधव राजवाडा या मॉ जिजाऊ जन्मस्थळासंदर्भातील विकास कामांमधील अडचणी दूर करुन आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी प्रयत्न करणार आहे. राजमाता जिजाऊ यांच्या जन्मोत्सवाला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शासकीय महापुजा करण्यासंदर्भात मंत्रिमंडळात प्रस्ताव मांडण्यात येईल. सिंदखेड राजा विकास आराखड्याला गती देण्यात येईल, असे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी यावेळी सांगितले.

### विद्युत रोषणाई, फुलांच्या माळांनी सजले मातृतीर्थ

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ यांचा आज जन्मदिवस आहे. जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात राजमाता जिजाऊंचा जन्म झाला होता. दरवर्षीप्रमाणे या जन्मस्थळी मोठ्या उत्साहात राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्यानिमित्त राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ असलेला लखुजीराजे जाधव यांचा राजवाड्याची आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांच्या माळांनी सजावट करण्यात आली होती.

### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या प्रश्नावर संतापले अजित पवार

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सात जणांवर मकोका लागवण्यात आला. आणखी एकाचा शोध सुरू आहे. आरोपी सापडताच त्याच्या विरोधातही मकोका अंर्गत कारवाई होणार आहे. सरपंच देशमुख हत्या प्रकरणाशी संबंधित खंडणी वसुली प्रकरणात वाल्मिक कराड याला अटक झाली आहे. वाल्मिक कराड विरोधात कोणत्या कलमांतर्गत कारवाई होणार हे अद्याप पोलिसांनी जाहीर केलेले नाही. पोलीस कारवाई सुरू असली तरी या प्रकरणात राजकीय विरोधक सतत धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. या संदर्भात विचारेल्या प्रश्नाला उत्तर देताना अजित पवार संतापले.

सरपंचाच्या बाबतीत जो घडले त्यातील तथ्य जाणून घेण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी, सीआयडी ते न्यायालयीन चौकशी अशा तीन पातळीवर चौकशी सुरु केली आहे. कोणालाही विशेष संरक्षण मिळणार नाही. चौकशीत दोषी आढळणाऱ्या व्यक्ती विरोधात कारवाई होईल. अगदी मंत्री असला तरी कारवाई होईल, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले हे सांगूनही अजित पवारांना धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत विचारण्यात आले. प्रश्नांच्या या सरबत्तीमुळे अजित पवार संतापले.

## स्वराज्य जननी माँ जिजाऊंच्या ४२७ व्या जयंतीनिमित्त

# मातृतीर्थात लाखो जिजाऊभक्तांची मांदियाळी


## लखुजीराजेंच्या वंशजांच्याहस्ते जिजाऊंचे महापूजन

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**सिंदखेडराजा :** स्वराज्य जननी माँ जिजाऊंच्या ४२७ व्या जयंतीदिनी त्यांना अभिवादन करण्यासाठी मातृतीर्थ सिंदखेडराजात लाखो जिजाऊभक्तांची मांदियाळी जमल्याचे दिसून आले.यावेळी सर्वप्रथम जिजाऊंचे मानाचे पूजन लखुजीराजे जाधवांच्या वंशजांच्या हस्ते प्रातःसमयी करण्यात आले.





जिजाऊंच्या जयंती निमित्त संपूर्ण महाराष्ट्र तसेच देशभरातून दिनांक ११ जानेवारीपासूनच जिजाऊ भक्तांचे जत्थेच्या जत्थे मातृतीर्थात दाखल झाल्याचे चित्र दिसून आले. जिजाऊभक्तांच्यावतीने माँ जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी वारकरी दिंडी,ढोलपथक,पालखी सोहळा,सनई चौघडे आदी मंगलवाद्ये घेऊन आयोजन करण्यात आल्याचे दिवसभर दिसून आले.सकाळी ठीक ५ वाजून ४५ मिनिटांनी लखुजीराजेंचे वंशज विजयसिंह राजे,विजय भगवंत राजे,आनंद राजे,प्रा. गोपाल राजे,सुभाष राजे,प्रभाकर राजे,अभि राजे,मालोजी राजे,जितेंद्र राजे,ज्ञानेश राजे,यांनी जिजाऊंचे पूजन केले.यावेळी फटाक्यांची आतिषबाजी व पूजनासाठी उपस्थित जिजाऊभक्तांच्या वतीने जिजाऊ जय शिवराय,च्या घोषणेने जिजाऊंचे जन्मस्थळ दुमदुमले होते.

राजवाड्यातील दरबारात यंदाही किनगावराजा येथील लखुजीराजेंच्या वंशजांच्यावतीने लखुजीराजेंची प्रतिमा ठेवण्यात आली होती.यावेळी प्रतिमेचे पूजन मराठा क्रांती ठोकमोर्चाचे राज्य समन्वयक महेश डोंगरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.जिजाऊ जयंतीसाठी उपस्थित असलेल्या हजारो जिजाऊ भक्तानी लखुजीराजेंच्या प्रतिमेस अभिवादन केले.

यंदाच्या जिजाऊ जयंतीनिमित्त राजवाड्यातील जिजाऊ जन्मस्थळाजवळ जिजाऊंच्या पाळण्याचे विशेष आयोजन करण्यात आले होते. प्रा.गोपाल राजे, आनंद राजे,सुभाष राजे,मालोजी राजे यांनी त्याचे नियोजन केले होते. जिजाऊंचे पूजन झाल्यानंतर पाळण्याचा सोहळा साजरा करण्यात आला.यामध्ये बाल जिजाऊंची मूर्ती ठेऊन सौ. अनुराधा राजे,सौ.प्रतिभा राजे,सौ. नीता राजे,सौ.प्रज्ञा राजे,यांनी पाळणा गीत गायन केले.तर लहान मुलींनी पाळण्याभोवती फेर धरून नृत्य करीत जन्मोत्सव साजरा केला.

## सौरऊर्जेत महाराष्ट्राची कामगिरी उल्लेखनीय

महाराष्ट्राने सौरऊर्जा निर्मिती क्षेत्रात केलेली कामगिरी ही उल्लेखनीय अशीच असून, त्यासाठीच केंद्र सरकारने राज्याला २६० कोटी रुपये प्रोत्साहनपर रक्कम दिली आहे. सौरऊर्जेचा वापर करून ग्राहक ३०० युनिटपर्यंत वीज वापरत असून, उरलेली युनिट महावितरणला विकून त्यातून अतिरिक्त उत्पन्न मिळवत आहेत. त्यामुळे सौरऊर्जा ही महाराष्ट्राची भाग्यशक्ती ठरली आहे. घरांच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्स बसवून वीजनिर्मिती करण्याच्या योजनेत उत्तम कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्याला गेल्या चार वर्षांत केंद्र सरकारकडून २६० कोटी, ९१ लाख रुपये प्रोत्साहनपर रक्कम प्राप्त झाली. छतावर सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविणार्या ग्राहकांना केंद्र सरकारकडून अनुदान मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३०० युनिटपर्यंत वीज वापरणार्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी, तसेच अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे, यासाठी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' सुरू केली. या योजनेत वीजग्राहकांना थेट लाभ होत असल्याने योजनेची प्राधान्याने अंमलबजावणी करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केल्या आहेत. महायुती सरकारच्या कार्यकाळात या योजनेला राज्यात गती मिळाली असून, आता एकूण २ लाख, ३७ हजार प्रकल्प कार्यान्वित झाले असून, हे प्रकल्प २ हजार, ७३८ मेगावॅट इतकी सौर वीजनिर्मिती करत आहेत. या योजनेअंतर्गत छतावर सौर पॅनेल बसवणार्या कुटुंबाला थेट अनुदान दिले जाते. महायुती सरकारने सौरऊर्जेचे महत्त्व लक्षात घेत, या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू केली असल्यानेच, केंद्र सरकारने महाराष्ट्रातील महायुती सरकारचे प्रोत्साहनपर रक्कम देत कौतुक केले आहे. छतावरील सौरऊर्जा निर्मिती योजना म्हणजे घरांच्या छतावर सौर पॅनेल्स बसवून वीजनिर्माण करण्याची योजना. ग्राहकांना यात ३०० युनिटपर्यंत वीज वापरता येतेच, त्याशिवाय अतिरिक्त वीज विकून त्यांना दरमहा शाश्र्वत उत्पन्नही सुरू होते. पारंपरिक पद्धतीच्या वीज उत्पादन केंद्रांवरचा ताण कमी करण्याबरोबरच पर्यावरणीय ऊर्जेच्या वापराला चालना देण्याचे मोठे काम ही योजना करत आहे. या योजनेचा उद्देश सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे, तसेच घरगुती ग्राहकांना आर्थिक लाभ मिळवून देणे हा आहे. ज्या वेगाने राज्यात ही योजना राबवली आहे, तो वेग पाहता राज्यात ही योजना कमालीची यशस्वी ठरल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्याने सौरऊर्जा क्षेत्रात केलेली कामगिरी, ही विशेष उल्लेखनीय. महाराष्ट्रात सौरऊर्जा उत्पादनाची क्षमता आता हजारो मेगावॅट्समध्ये आहे. राज्याने २०२२ सालापर्यंत ८ हजार, ८०० मेगावॅट्स सौरऊर्जा उत्पादनाचे लक्ष्य ठेवले होते. महाराष्ट्र सरकारने सौरऊर्जा क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी विविध धोरणे आणि योजना तयार केल्या आहेत. यामध्ये खासगी गुंतवणूकदारांना आकर्षित करणे, तसेच सौरऊर्जा प्रकल्पांसाठी अनुकूल परवानगी प्रक्रिया समाविष्ट आहे. महाराष्ट्रात 'सौर पार्क्स'ची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे उत्पादन वाढीसाठी आवश्यक जागा उपलब्ध झाली आहे. ग्रामीण भागात सौरऊर्जेचा वापर विद्युतीकरणासाठी आणि जलपूर्ती प्रणालींसाठी केला जात आहे. सौरऊर्जा क्षेत्राने स्थानिक स्तरावर रोजगार निर्माण करण्याचे कामही केले आहे. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला साहाय्य मिळाले आहे. महाराष्ट्र सौरऊर्जा क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानांचा वापर करत असून, भविष्यात अधिक सक्षम व टिकाऊ ऊर्जापुरवठा करण्यासाठी विशेष प्रयत्न करतो आहे. सौरऊर्जा उत्पादन वाढविण्याच्या या प्रयत्नात शाश्वत आणि पर्यावरणास अनुकूल उपायांचा समावेश आहे. महाराष्ट्राची ऊर्जेची गरज ही प्रचंड अशीच आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टीने ही गरज आवश्यक अशीच. महाराष्ट्र हे देशातील औद्योगिकृत राज्यांपैकी एक असल्याने, त्याची ऊर्जा मागणी सतत वाढत आहे. महाराष्ट्रात अनेक औद्योगिक क्षेत्रे आहेत. यात माहिती तंत्रज्ञान, उत्पादन, रसायन उद्योग यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यामुळे राज्याची ऊर्जा मागणी वाढते. तसेच मुंबई, पुणे, नाशिक यांसारखी मोठी शहरे असल्याने, शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे विजेचा वापर आणि मागणी वाढते. महाराष्ट्रात सौर आणि पवनऊर्जा यांसारख्या पुनर्नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढत आहे. त्यामुळे ऊर्जा गरजांमध्ये एक स्थिरता येत आहे. त्याचवेळी, राज्य सरकार ऊर्जेच्या कार्यक्षमतेकडे लक्ष देत असून, यात वीजवितरण प्रणाली बळकट करणे याचा समावेश आहे. सरकार विविध धोरणेही आणत आहे. ही धोरणे पुनर्नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांचा वापर वाढवण्यास मदत करत असून, ती वीजवितरण सुधारणारी ठरत आहेत. महाराष्ट्रातील शेतकर्यांसाठी सौर कृषीपंप हे यशस्वी ठरले आहेत. या योजनेचे उद्दिष्ट शेतकर्यांना सौरऊर्जेचा वापर करण्यास प्रोत्साहित करणे, तसेच त्यांच्या खर्चात कपात करणे हा आहे. यातूनच पर्यावरणाचे हितही जोपासले जात आहे. या योजनेअंतर्गत शेतकर्यांना सौर पंपांचे अनुदान दिले जाते. ज्या शेतकर्यांना पारंपरिक वीज पंप वापरण्यात अडचण येते, त्यांच्यासाठी सौरऊर्जा हा एक चांगला पर्याय ठरला आहे. सौर पंपांचा वापर केल्याने शेतकर्यांना ठराविक दराने वीज मिळतेच, त्याशिवाय त्याला पाहिजे तेव्हा शेतीला पाणी देता येते. पाण्याचा वापर अधिक प्रभावीपणे करता येतो, त्यामुळे कृषी उत्पादन वाढत आहे. पारंपरिक पद्धतीने त्याला वीज महामंडळावर अवलंबून राहावे लागत होते. तथापि, आता हे अवलंबित्व संपुष्टात येत आहे. तसेच, पारंपरिक वीज पंपांच्या तुलनेत सौर पंपांचा खर्च तुलनेने कमी असून, शेतकर्यांना वीज बिलांचा बोजा कमी करण्यास त्याची मदत होत आहे. सौरऊर्जा आधारित पंपांचा वापर केल्याने जलस्त्रोतांवरचा ताण कमी होत असून, पाण्याचा अधिक समतोल वापर साधता येणार आहे. महाराष्ट्र सरकार सौर पंप प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणार्या शेतकर्यांना अनुदान आणि विविध सवलती देऊ केल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राचे ऊर्जामंत्री म्हणून कार्यरत असताना अनेक महत्त्वाची पावले उचलली. त्यांच्या कार्यकाळात ऊर्जाक्षेत्रातील विकास आणि आद्यतनीकरणासाठी त्यांनी काही प्रमुख धोरणे व योजनेत सुधारणा करण्यात आली. त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्राने ऊर्जाक्षेत्रात उत्पादन क्षमतामध्ये वाढ साधली. त्यांनी विविध नूतनीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन दिले. यात सौर तसेच पवनऊर्जा प्रकल्प यांचा उल्लेख करावा लागेल. तसेच सौरऊर्जा धोरण त्यांनी विकसित केले, त्यामुळे शेतकर्यांना सौरऊर्जेवर आधारित कृषीपंप वापरता येऊ लागले. तसेच त्यांनी वीज वितरणातील कार्यक्षमतेमध्ये सुधारणा घडवून आणली. त्याचबरोबर, राज्यातील ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यासाठी विविध पावले त्यांनी उचलली. फडणवीस यांनी शाश्र्वत आणि प्रदूषणमुक्त ऊर्जा उत्पादनास प्रोत्साहन दिले. म्हणूनच, सौरऊर्जा क्षेत्रात राज्याने कौतुकास्पद अशीच कामगिरी केलेली दिसून येते. त्याची पोचपावती केंद्र सरकारने प्रोत्साहन देत दिली आहे.

# जिजाऊ चौक डिजिटल कमानीचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** तुळशीराम मानघाले यांच्या प्रयत्नातून मेहकर शहरात उभारलेल्या जिजाऊ चौक डिजिटल कमानीचे माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते आज उद्घाटन करण्यात आले. शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, शहरप्रमुख जयचंद बाठीया प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते तुळशीराम मानघाले यांनी स्वखर्चातून शहरातील मुख्य चौकात जिजाऊ चौक डिजिटल कमान उभारली असून आज जिजाऊ जन्मोत्सवाच्या निमित्ताने सदर कमानीचे रीतसर उद्घाटन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिजाऊ चौकात रंगीबेरंगी फुलांची सजावट आणि भव्य रांगोळी तयार करण्यात आली होती. कार्यक्रमाला माजी जि. प. सदस्य मनीष शेळके, भास्कर राऊत, तन्सिराम मानघाले, गोपाल मानघाले, रामेश्वर भिसे, धनुभाऊ मानघाले, संतोष पवार, भास्कर बचाटे, नितीन राऊत, रवी जुनघरे, विकास जोशी,संतोष अवस्थी, राजीव काटे, सुमित शिंदे, मंगेश गायकवाड, पियुष केळे माजी नगराध्यक्ष रामराव म्हस्के, रुपेश खडसे, रवी शेळके आदींसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी तुळशीराम मानघाले यांचा संजय रायमुलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.




## अरुण गोविल कसे बनले 'रामायण'मधील 'राम'? या व्यक्तीमुळे अजरामर झाला अभिनेता

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता अरुण गोविल यांचा आज वाढदिवस आहे. अरुण गोविल यांचा आज ६७ वा वाढदिवस आहे. प्रसिद्ध टीव्ही मालिका 'रामायण'मध्ये भगवान रामाची भूमिका साकारल्यानंतर त्यांना याच रूपात ओळख मिळू लागली. प्रभू राम म्हणून त्यांची अशी ओळख निर्माण झाली की लोक त्यांची पूजा करू लागले. त्याचे पोस्टर्स घरोघरी दिसत होते. अरुण गोविल कुठेही जायचे लोक पोहोचतात तेव्हा लोक त्याची देवाप्रमाणे पूजा करायचे. रामायणापूर्वीही अरुण गोविल काही चित्रपटांचा भाग होते, परंतु टीव्हीवरील प्रसिद्ध धार्मिक मालिका रामायणने त्यांना जी ओळख दिली ती बॉलिवूड त्यांना देऊ शकले नाही. १२ जानेवारी १९५८ रोजी जन्मलेल्या अरुण गोविल यांनी काही चित्रपट केले पण १९८७-८८ या काळात भगवान राम या त्यांच्या भूमिकेने खूप प्रसिद्धी मिळवली. २०२० मध्ये जेव्हा लॉकडाऊन लागू करण्यात आला तेव्हा सरकारने पुन्हा रामायण प्रसारित करण्यास सुरुवात केली आणि याद्वारे आजच्या पिढीलाही अरुण गोविल यांच्या दमदार अभिनयाची माहिती झाली. पण, तुम्हाला माहीत आहे का अरुण गोविल 'रामायण'चा 'राम' कसे बनले आणि त्यांना हा शो कसा मिळाला. वास्तविक, अरुण गोविल यांना रामायणाचा राम बनवण्यात ताराचंद बडजात्या आणि सूरज बडजात्या यांचा मोठा वाटा आहे. कारण, सुरुवातीला रामानंद सागर यांनी अरुण गोविल यांना रामची भूमिका देण्यास नकार दिला होता. यानंतर सूरज बडजात्या यांच्यामुळे अभिनेत्याला ही भूमिका मिळाली. अरुण गोविल यांनी एका मुलाखतीत याचा खुलासा केला होता.अरुण गोविल यांनी सांगितले की, भगवान रामच्या भूमिकेसाठी ऑडिशन दिल्यानंतर सुरुवातीला त्यांना नकार देण्यात आला होता. पण, नंतर सूरज बडजात्याने त्यांना रामच्या भूमिकेसाठी लूक टेस्ट दरम्यान हसण्याचा सल्ला दिला. अभिनेत्यानेही सूरज बडजात्याचे म्हणणे पाळले.

## धक्कादायक! अमरावतीच्या गोल्डन फायबर कंपनीत विषबाधा; शेकडो कामगारांची प्रकृती बघडली

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीच्या नांदगाव पेठ एमआयडीसी मधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील गोल्डन फायबर कंपनीत १०० पेक्षा अधिकच्या कामगारांना अचानक विषबाधा झाल्याची माहिती पुढे आली आहे. अन्न किंवा पाण्यातून विषबाधा झाल्याची प्राथमिक माहिती आहे. यात अनेक म हिलांना उलट्यांचा त्रास होत असल्याचे निदर्शनात आले आहे. घटनेची माहिती मिळताच यातील रुग्णांना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. मात्र ही विषबाधा नेमकी कशी आणि कशातून झाली हे अद्याप कळू शकलेले नसले तरी त्या दिशेने तपास सुरू आहे.

दरम्यान, अशीच एक संतापजनक घटना अमरावतीत घडली आहे. यात बिस्किट पुड्यात चक्क अळ्या आढळल्याचा प्रकार घडला आहे. नारायण कराडे यांच्या घरी हा प्रकार घडला आहे. नारायण कराडे यांनी दुपारी शहरातील डी मार्ट मॉलम धून अनेक वस्तू खरेदी केल्या होत्या. यासोबतच बिस्कीटांची देखील खरेदी केली होती. मात्र, घरी आल्यानंतर बिस्किट उघडताच त्यातून अळ्या बाहेर पडल्याचे प्रकार घडला. यामुळं ग्राहकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या विरुद्ध कारवाईची मागणी आता नारायण कराडे यांनी केली आहे.

**अन्न व औषधी प्रशासन या गंभीर विषयाची दखल घेणार का?**

बिस्किटात अळ्या निघाल्याने नारायण कराडे आक्रमक झाले आहेत. त्यांनी या प्रकरणी कारवाई करण्याची मागमी देखील केली आहे. त्यामुळं आता त्यांच्या या म ागणीवर अन्न व औषधी प्रशासन या गंभीर विषयाची दखल घेणार का याकडे सर्वाचे लक्ष लागले आहे.

**अनेकवेळा शालेय पोषण आहारातही अळ्या निघाल्याचा प्रकार**

शालेय विद्यार्थ्यांना शाळेसोबत शिक्षणाची गोडी लागावी यासाठी शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आली आहे. मात्र या योजनेसाठी पुरवठा केला जाणार आहारातील माल निकृष्ठ दर्जाचा पुरवठा होत असल्याच्या घटना देखील समोर आल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात असल्याचा सवाल उपस्थित केला गेला आहे. शाळेत शालेय पोषण आहारासाठी या अगोदर अळ्या, किडे, पाल पडल्याने विषबाधा झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहे. अशा प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मागणी देखील होत आहे. शाळेत निकृष्ट दर्जाचं शालेय पोषण आहार देणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, आता मॉलम ध्ये मिळणाऱ्या मालात देखील अळ्या निघाल्याचा प्रकार समोर आल्यानं संताप व्यक्त केला जात आहे.

## मोसमातला पहिला आंबा पुण्यातील मार्केट यार्डात दाखल

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** फळांचा राजा अशी ओळख असलेला यंदाच्या सिझनमधील पहिला आंबा हा पुण्यातील मार्केटयार्डमध्ये दाखल झालाय. दरवर्षी देवगड येथून हापूस आंबा हा मार्केट यार्ड येथे दाखल होत असतो, पण यंदा देवगड येथील साद मुल्ला या शेतकऱ्याकडून केसर या आंब्याची पेटी ही मार्केट यार्ड येथे दाखल झाली असून, आज झालेल्या लिलावात सव्वा पाच डझनाच्या पेटीला तब्बल ३१ हजार रुपयांचा भाव मिळालाय.

३१ हजारांत मोसमामधील पहिल्या आंब्याची पेटी : मार्केटयार्ड येथील व्यापारी तसेच संचालक बापू भोसले यांच्या गाळ्यावर आज देवगड येथील साद मुल्ला या शेतकऱ्याकडून केसर या आंब्याची पेटी पोहोचवली आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते बाबा मि साळ आणि विविध व्यापाऱ्यांच्या उपस्थित झालेल्या लिलावात रावसाहेब कुंजीर यांनी ३१ हजार रुपयांत मोसमामधील पहिल्या आंब्याची पेटी खरेदी केलीय.



१५ मार्चनंतर आंब्याच्या सिझनला सुरुवात : तसेच मार्केट कमिटीचे संचालक बापू भोसले म्हणाले की, देवगड येथून मोसमातील पहिला आंबा हा आज मार्केट यार्ड येथे दाखल झालाय. साद मुल्ला या शेतकऱ्याच्या बागेतून हा आंबा आलाय. यंदा केसर या आंब्याची लागवड ही मोठ्या प्रम ाणावर झाली असल्याने पहिली पेटी ही केसर या आंब्याची आलीय. यावर्षी १५ मार्चनंतर आंब्याच्या सिझनला सुरुवात होणार आहे. पावसाळा जास्त दिवस राहिल्यानं आंबा उशिरा मार्केटमध्ये दाखल होईल, असा अंदाज आहे. आज पहिल्या पेटीला चांगला भाव मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचं वातावरण असल्याचंही बापू भोसले म्हणालेत.

४६ वर्षापासून मार्केटमध्ये प्रथम येणारा आंबा : यावेळी व्यापारी रावसाहेब कुंजीर म्हणाले की, गेल्या ४६ वर्षापासून मार्केटमध्ये प्रथम येणारा आंबा हा मी अनेकदा खरेदी करीत असतो. अनेक लोक आणि परदेशात राहणारे जे लोक आहेत, ते सातत्याने आंब्याबाबत माझ्याकडे चौकशी करीत असतात. आता मी त्यांच्याशी संपर्क करीत त्या लोकांना हा आंबा देणार असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलेय.

## पोळी दिली नाही म्हणून आमदार सुहास कांदेच्या अंगरक्षकाने वेटरवर रोखली बंदूक

**नाशिक/प्रतिनिधी :** रेल्वे स्थानकातील एका हॉटेलमध्ये जेवण करताना पोळी दिली नाही, म्हणून आमदार सुहास कांदे यांच्या अंगरक्षकाने वेटरवर चक्क बंदूक रोखल्याने म ोठी खळबळ उडाली आहे. विशाल झगडे असे त्या आमदार सुहास कांदे यांच्या अंगरक्षकाचं नाव आहे. या प्रकरणी अंगरक्षक विशाल झगडे याच्याविरोधात नाशिक रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकरोड रेल्वे स्थानकाजवळ रामकृष्ण हॉटेलमध्ये पोलीस अमलदार विशाल झगडे हा जेवणासाठी गुरुवारी ९ जानेवारी रोजी रात्री साडेबारा वाजता गेला होता. तक्रारदार हॉटेल व्यवस्थापक सागर पाटील यांच्या हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करणाऱ्या सिरॉन शेख यांनी विशाल झगडे याला ऑर्डर घेताना पोळी नसल्याचं सांगितलं. त्यावर विशाल झगडे आणि त्याच्यासोबत असलेल्या दोघांनी वाद घालत दमबाजी केली.

# वाल्मिक कराडला मोक्का का लावला नाही? देशमुख आणि सूर्यवंशी कुटुंबीयांना न्याय मिळावा : सुप्रिया सुळे

दैनिक आपला विदर्भ

**परभणी/प्रतिनिधी :** बीडमधील इतर आरोपींवर मोक्का लावण्यात आला, पण वाल्मिक कराडवर मोक्का का लावण्यात आला नाही? असा प्रश्न खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. या प्रकरणामध्ये धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा अशी मागणीही त्यांनी केली. संसदेच्या अधिवेशनामध्ये बीज आणि परभणी हे दोन्ही विषय मांडणार असल्याचे सुप्रिया सुळे म्हणाल्या. राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज परभणीत जाऊन दिवंगत सोमनाथ सूर्यवंशी आणि विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. दोन्ही कुटुंबीयांचे सांत्वन सुप्रिया सुळे यांनी केले आहे. यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी बीड आणि परभणी या दोन्ही प्रकरणांमध्ये न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी केली.

**दोन्ही घटना अमित शाहांच्या कानावर घातल्या**

परभणी आणि बीडच्या घटना माणुसकीला लाजविणाऱ्या आहेत. परभणी आणि बीडची घटना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कानावर घातली आहे आहे. या घटनेबाबत मुख्यमंर्त्याशी चर्चा केली आहे. या दोन्ही घटनेत कुटुंबीयांना न्याय मिळावा यासाठी शरद पवार प्रयत्नशील आहेत.

परभणीच्या घटनेमध्ये सरकार काहीतरी वेगळं बोलतं आणि वास्तव वेगळं आहे. सोमनाथ सूर्यवंशीची हत्या न्यायालयीन कोठडीमध्ये झाली आहे. देशमुख कुटुंब आणि सूर्यवंशी कुटुंब या प्रकरणात आम्हाला राजकारण करायचे नाही. दोन्ही कुटुंबाला न्याय मिळावा ही आमची अपेक्षा आहे असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**वाल्मिक कराडवर मोक्का का लावला नाही?**

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, ''बीड घटनेतील इतर आरोपींवर मोक्का लावला असेल तर वाल्मिक कराडावर का लावला नाही? वाल्मिक कराडवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. ईडीच्या केसमध्ये वाल्मिक कराडचे नाव एक नंबरला आहे. विरोधी पक्षातील नेत्यांना ईडीची नोटीस आल्यानंतर तात्काळ अटक झाली. मग यांना का होत नाही? वाल्मिक कराडकडे कोणाची माहिती आहे. त्यामुळे त्यांना स्पेशल ट्रिटमेंट दिली जाते. ज्या ज्या मागण्या नेत्यांनी केल्या आहेत, आरोप केले आहेत, त्याचे उत्तर तपासले पाहिजे.''

**धनंजय मुंडेंनी राजीनामा द्यावा**

बीड प्रकरणात जो आरोपी फरार आहे त्याला तात्काळ पकडले पाहिजे. धनंजय मुंडे यांनी माणुसकीच्या नात्याने आणि नैतिकतेच्या आधारावर राजीनामा द्यावा अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली. वाल्मिक कराड कुठून येतो हे पोलिसांना माहीत होत नाही. हे गृह खात्याचे नाही तर सरकारचे अपयश आहे असंही त्या म्हणाल्या.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी साईबाबा समाधीचे घेतले दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी श्री साईबाबा समाधीचे दर्शन घेतले. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व श्री साईबाबा संस्थान तदर्थ समिती अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश अंजु एस. शेंडे (सोनटक्के), श्री साईबाबा संस्थान समिती सदस्य तथा जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आदी उपस्थित होते.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साई चरणी लीन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी :** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी श्री साईबाबा समाधीचे दर्शन घेतले. यावेळी श्री साईबाबा संस्थान तदर्थ समिती अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश अंजु एस. शेंडे (सोनटक्के) व संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर आदी उपस्थित होते.

### पहिला पती असताना दुसरे लग्न करणं पडलं महागात; पत्नीसह ११ नातेवाईकांविरुद्ध गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** पहिल्या पतीसोबत संसार सुरू असताना विश्वासघात करून दुसऱ्या पुरुषाशी विवाह करणे पत्नीला चांगलेच महागात पडले आहे. या प्रकरणात पहिल्या पतीने दिलेल्या तक्रारीवरून पत्नीसह ११ नातेवाईकांविरुद्ध अर्धापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोहर सुरेश तरटे यांचा विवाह वैशाली भीमराव भोसले यांच्यासोबत २०१९ साली झाला होता. त्यानंतर वैशाली आणि मनोहर यांना मुलगा झाला. या दोघांचा संसार सुरू असताना वैशाली हिने तीन वर्षांचा आपल्या मुलाला घेऊन मनोहरच्या घरातून पलायन केले. मनोहर तरटे यांनी आपली पत्नी आणि मुलाचा शोध घेतला, परंतु ते त्यांना कुठेही आढळून आले नाही. दरम्यान पत्नी वैशाली हिने अंकुश सांडू शिंदे छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील हट्टी येथील याच्याशी दुसरा विवाह केला. याबाबत अनेक वेळा पोलीस ठाण्यात तक्रार देऊनही आरोपी विरुद्ध कारवाई झाली नाही. अखेर मनोहर तरटे यांनी अर्धापूर न्यायालयात धाव घेतली. दरम्यान आरोपी पत्नी वैशाली हिने दुसऱ्या व्यक्तीसोबत दुसरा विवाह केल्यामुळे तिच्यासह नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश अर्धापूर न्यायालयाने दिले. न्यायालयाच्या आदेशानुसार पत्नी वैशाली आणि तिच्या ११ नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मुलींवरील वाढत्या अत्याचारा विरोधात कल्याणकर आक्रमक




दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली परिसरात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना समोर आल्यानंतर संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. याच पार्श्र्वभूमीवर आज कल्याणमधील नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात मानवी साखळी बनवत तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी नागरिकांनी हातात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कठोर न्यायव्यवस्थेची आठवण करून देणारी पोस्टर्स घेऊन आपला रोष व्यक्त केला आहे. यावेळी मुलींवर अत्याचार करणाऱ्या नराधमांना कठोरात कठोर शिक्षा आणि दोषींना फाशीची शिक्षा देण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन या वेळी नागरिकांनी प्रशासनाला केले आहे.

# शरद पवारांकडून दगा-फटक्याचे राजकारण, ठाकरेंचा द्रोह

## अमित शाहांचा भाजप महाअधिवेशनात प्रहार; म्हणाले, खरी राष्ट्रवादी अन् शिवसेना...

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनले. खरी शिवसेना आणि खऱ्या राष्ट्रवादीचाही मोठा विजय झाला. महाराष्ट्राच्या राजकारणात १९७८ पासून शरद पवार यांनी दगा-फटक्याचे राजकारण सुरु केले. त्याला २० फूट जमिनीत गाढण्याचे काम तुम्ही केले. उद्धव ठाकरे यांनी २०१९ साली आपल्या सोबत द्रोह केला, त्यांना आपण त्यांची जागा दाखवून दिली, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. शिर्डी येथे आयोजित भाजपच्या महाअधिवेशनात ते बोलत होते.

अमित शाह म्हणाले की, देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनले. इतक्या मोठ्या संख्येने आपले कार्यकर्ते आमदार झाले, मंत्री झाले. खरी शिवसेना आणि खऱ्या राष्ट्रवादीचाही मोठा विजय मिळाला. महाराष्ट्राच्या राजकारणात १९७८ पासून शरद पवार यांनी दगा-फटक्याचे राजकारण सुरु केले. त्याला २० फूट जमिनीत गाढण्याचे काम तुम्ही केले आहे. उद्धव ठाकरे यांनी २०१९ साली आपल्या सोबत द्रोह केला, बाळासाहेब ठाकरेंच्या सिद्धांतांना सोडले. त्या उद्धव ठाकरेंना आपण त्यांची जागा दाखवली. १९७८ पासून २०२४ पर्यत महाराष्ट्रात अस्थिरता दिसून आली. त्या अस्थिरतेच्या राजकारणाला संपवून तुम्ही देवेंद्र फडणवीस यांचे स्थिर सरकार निवडून देण्याचे काम केले, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला.

**परिवार वादाला तुम्ही फटकारले**

ते पुढे म्हणाले की , लोकसभा निवडणुकीनंतर आमचे सरकार बनेल, असं ते स्वप्न पाहत होते, त्यांचे स्वप्न भंग करण्याचे काम तुम्ही केले. सिद्धांताचे राजकारण करण्याचे काम तुम्ही केले. परिवार वादाला तुम्ही फटकारले. लाडकी बहीण आणि शेतकऱ्यांना मी धन्यवाद देतो. शरद पवार पत्रकारांना शिकवत होते. आता मी शरद पवार यांना शिकवतो. कुठे किती जागा जिंकल्या? तिकीट वाटपात काही नाराज झाले, मात्र तरीही कमळ आणि महायुतीला मदत केली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांचा पक्ष खरा असल्याचे तुम्ही दाखवून दिले.

आगामी निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी व्हायचंय

२०२४ वर्ष हे भाजपसाठी चांगले राहिले आहे. मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान झाले. हरियाणामध्ये भाजप तिसऱ्यांदा जिंकली. २०२४ हे वर्ष महत्वाचं वर्ष आहे. हा इतिहास लिहिला जाईल. आम्ही थकणारे नाहीत. महाराष्ट्रात ४० लाख सदस्य बनले आहेत. एकूण दीड कोटी सदस्य बनवायचे आहेत. दीड महिन्यात पुढे जायचं आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी व्हायचे आहे. विरोधकांना एकही जागा मिळणार नाही. सर्वच ठिकाणी भाजप आली पाहिजे. तुमचे आभार मानायचे आहेत, सोबत पुढील काम देखील सांगायचे आहे, असेही अमित शाह यांनी म्हटले.

# भुजबळांचा सल्ला घेण्याची गरज वाटली नाही, कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंनी पुन्हा डिवचले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गरज वाटली तर मी छगन भुजबळ यांची भेट घेईल. मला जर वाटले त्यांचा सल्ला घ्यायचा आहे, तर मी भेट घेईल. पण भुजबळांचा सल्ला घ्यावा असे अजूनतरी मला वाटत नाही असा टोला कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी लगावला. पक्षाने मला आदेश दिला आहे, वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरु आहे. खाली आपण कोणताही भाष्य करु नये. त्यामुळं मी त्या संदर्भात काही स्टेटमेंट करु इच्छित नाही असेही ते म्हणाले.

भुजबळ साहेबांना माहिती आहे, त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला माझ्याकडे उत्तर आहे. पण कलगीतुरा नको. पार्टीकडून मला आदेश आले आहे की, भाष्य करू नये, त्यांच्याबाबतीत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. माझ्या दृष्टीने त्यांचा विषय संपला आहे, असेही त्यांनी काल म्हटले होते. तसेच राष्ट्रवादीने छगन भुजबळांचे खूप लाड केले आहेत. त्यांचे अजून किती लाड करायचे? असा सवाल उपस्थित करत राज्याचे माणिकराव कोकाटे यांनी छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला होता. जो जे वांच्छिल ते तो लाभो. त्यांना कुठे जायचे तिकडे जाऊद्यात, असे देखील माणिकराव कोकाटे यांनी म्हटले होते.

**नाशिक जिल्हा बँक अडचणीत**

नाशिक जिल्हा बँक अडचणीत आली आहे. ठेवीदारांना अनेक अडचणी आहेत. मात्र, शेतकरी ज्यांचे कर्ज आहे ते भरत नाहीत. शासनाकडून कारवाई सुरु आहे, ती कारवाई थांबवण्यासंदर्भात या ठिकाणी मला शेतकरी भेटल्याचे कोकाटे म्हणाले. कारवाई थांबवणे अवघड आहे, मात्र कायदेशीर मार्ग काढू असे ते म्हणाले. सहकार मंत्री मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करु असंही कोकाटे म्हणाले.



**कर्जमाफीच्या संदर्भातील विषय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हाताळतायेत**

जर त्यांनी बेकायदेशीर कर्ज वाटप केले असेल तर संचालक मंडळावर कारवाई केलीच पाहिजे असेही कोकाटे म्हणाले. मी स्वत: असेल तरी माझ्यावर कारवाई झाली पाहिजे असे कोकाटे म्हणाले. कर्जमाफीच्या संदर्भातील विषय हे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हाताळत आहेत. ते त्याप्रमाणे निर्णय देखील घेऊ शकतात. मी त्यावर खुलासा करू शकत नाही ते माझं खातं नाही. शेतकरी कर्जमाफीमध्ये दोन गट आहेत, एक सातत्याने कर्ज भरणारे मग आमच्यावर अन्याय का? आणि जे थकबाकीदार आहेत ते म्हणतात आत्महत्येची वेळ आली, कर्ज माफ करा असे दोन मत प्रभाह आहे. याच्यावर विचारपूर्वक निर्णय सरकार घेईल असे कोकाटे म्हणाले.

### इथेनॉल निर्मितीत शेतकरी बनणार किंग, मकेचे उत्पादन वाढवण्यावर भर, सरकारने सुरु केला नवा प्रकल्प

**मुंबई/प्रतिनिधी :** देशात इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध उपायोजना करताना दिसत आहे. कारण, मोठ्या प्रमाणात देशाचा पैसा हा इंधनाच्या आयातीवर खर्च होत आहे. त्यामुळं सरकार इथेनॉल मिश्रित पेट्रोलचे उत्पादन देशात अधिक वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. पेट्रोलियमची आयात कमी करुन ते पैसे शेतकऱ्यांना देण्याची मोहीम सरकारनं सुरु केली आहे. इथेनॉलमुळे शेतकरी आता केवळ अन्नदाताच नव्हे तर ऊर्जा प्रदाता म्हणूनही ओळखले जाऊ लागला आहेत. यासाठी सरकार मकेपासून इथेनॉल बनवण्यावर भर देत आहे. म्हणूनच 'इथेनॉल उद्योगांच्या पाणलोट क्षेत्रात मका उत्पादन वाढवणे' हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. याची जबाबदारी भारतीय मका संशोधन संस्थेला देण्यात आली आहे.

# मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर छगन भुजबळांची समता परिषद ॲक्टिव्ह मोडवर; आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची तयारी

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव/प्रतिनिधी :** राज्यात महायुतीची सत्ता आली. मात्र राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाला नाही. मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर छगन भुजबळांनी जाहीर नाराजी व्यक्त केलीय. आता छगन भुजबळ यांची अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद ॲक्टिव्ह झाल्याचे पहायला मिळत आहे. मराठवाड्यात गाव तिथे समता परिषदेची शाखा आणि घर तिथे समता सैनिक ही मोहीम समता परिषदेकडून राबविण्यात येत आहे. धाराशिव येथे समता परिषदेची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत परिषदेचे राज्य उपाध्यक्ष सुभाष राऊत यांनी पुढील रणनीती पदाधिकाऱ्यांना सांगितली. धाराशिव जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात १०० शाखांचे उद्घाटन करण्याचं यावेळी ठरवण्यात आले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पूर्ण ताकदीने लढण्याची तयारी छगन भुजबळांची समता परिषदेकडून सुरू असल्याचे चित्र आहे.



**माळी समाजाच्या मेळाव्यात छगन भुजबळ यांची मागणी**

जातीनिहाय जनगणनेची मागणी आम्ही अनेक वर्षांपासून करत आहोत. मात्र आमची वेळोवेळी फसवणूक झालेली आहे. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. मात्र ते आमच्यात आले तर आम्हालाही काही मिळणार नाही आणि त्यांनाही काही नाही. त्यामुळे जातीनिहाय जनगणना करा नाहीतर आम्हाला ५१म घोषित करा. अशी मागणी आज शेगाव येथील माळी समाजाच्या मेळाव्यात केली. यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांच्यावरही टीका केली.

छगन भुजबळ म्हणाले की, ''अशा कार्यक्रला जाणे मी टाळतो. कारण समाज एक असला तरी पक्ष वेगळे असतात, विचारसरणी वेगळी असते. मी ओबीसींच्या प्रश्नावर शिबसेना सोडली. मी नरसिंह राव यांच्याकडे गेलो. त्यावेळी नरसिंह राव यांनी ओबीसी समाजाची सेवा करण्याचा सल्ला दिला होता. त्यातूनच समता परिषद स्थापन झाली. आदिवासी, दलित, ओपन आणि ओबीसी या चार वर्गात बाबासाहेबांनी समाजाला बांधले. व्ही पी सिंहानी नंतर मंडळ आयोगासाठी काम केले. त्यानंतर आपल्याला ३० टक्के आरक्षण मिळाले.''

टाटा, बिर्लापेक्षा महात्मा फुलेंचे बॅलेन्स शीट मोठे होत. इतर देशात महिला पुढे आहेत, महिलांना आपल्याकडे शिक्षण मिळाले पाहिजे. सावित्री बाईंच्या शाळेत पहिल्या दिवशी सर्व ब्राह्मण मुली होत्या. त्यांनी त्यावेळी अत्याचारग्रस्त मुलींना दत्तक घेतले, त्यांचा सांभाळ केला. माळी समाजाने शिवाजी महाराजांच्या काळात त्यांच्यासोबत काम केले असे छगन भुजबळ म्हणाले.

### विदेशी गुंतवणूकदारांनी शेअर बाजारातून जानेवारीच्या पहिल्या १० दिवसात २२१९४ कोटी काढून घेतले, नेमकी कारणे काय?

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर घसरण झाल्याचं पाहायला मिळालं. विविध कारणांमुळं भारतीय शेअर बाजारात घसरण झाली. शुक्रवारी बाजार बंद झाला तेव्हा सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये घसरण झाली. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जानेवारी महिन्यात म्हणजेच पहिल्या १० दिवसांमध्ये २२१९४ कोटी रुपये भारतीय शेअर बाजारातून काढून घेतले आहेत. भारतातील कंपन्यांचे तिसऱ्या तिमाहीचे निकाल कमजोर असण्याची शक्यता, डॉलरची मजबूत होणं त्याचवेळी अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प हे येत्या काही दिवसात अध्यक्षपद स्वीकारणार आहेत. त्यानंतर टॅरिफ वॉर वाढण्याची शक्यता असल्यानं विदेशी गुंतवणूकदारांकडून काढता पाय घेतला जात आहे. डिसेंबर महिन्यात विदेशी गुंतवणूकदरांनी भारतीय बाजारात १५४४६ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती.

डिपॉजिटरीच्या आकडेवारीनुसार विदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांकडून १० जानेवारीपर्यंत २२१९४ कोटी रुपये काढण्यात आले आहेत. २ जानेवारीचा दिवस वगळता ज्या दिवशी बाजार सुरु होता त्या दिवशी विदेशी गुंतवणूकदारांनी त्यांचे समभाग विकून २२१९४ कोटी रुपये काढून घेतले आहेत.

मॉर्निंगस्टार इन्वेस्टमेंट रिसर्च इंडियाचे असोसिएट डायरेक्टर आणि रिसर्च मॅनेजर हिमांशु श्रीवास्तव यांनी म्हटलं की भारतीय बाजारातून विदेशी संस्थांकडून पैसे काढून घेतले जात आहेत त्याला अनेक कारणं आहेत. यामध्ये कंपन्यांचे तिसऱ्या तिमाहीच्या कामगिरीचे निकाल कमजोर असू शकतात हे एक कारण असू शकतं. याशिवाय ट्रम्प प्रशासनातील टॅरिफ वॉरची शक्यता, जीडीपीच्या विकास दरात आलेली मंदी, वाढलेली महागाई, भारतात व्याज कपात सुरु होण्याबाबत असलेली अस्थिर स्थिती, याशिवाय भारतीय रुपयाचं कमोजर होणं, अमेरिकी बाँड यील्ड मध्ये झालेली वाढ, भारतीय शेअर बाजाराचं अधिक मूल्यांकन यामुळं देखील विदेशी गुंतवणूकदार समभाग विक्री करत आहेत.

जिओजित फायनान्शिअल सर्विसेसचे मुख्य गुंतवणूक रणनीतीकार वी.के. विजयकुमार यांनी म्हटलं की, एफपीआयकडून सातत्यानं सुरु असलेल्या विक्रीचं कारण डॉलर इंडेक्स मध्ये होत असलेली वाढ हे एक आहे. जो सध्या १०९ वर आहे. १० वर्षासाठी बाँडवरील परतावा ४.६ टक्क्यांपेक्षा अधिक आहे.

## छत्रपती संभाजीनगर शहरात १८ हजार प्लास्टिकच्या बॉटल्सपासून

# जिजाऊंचे रेखाचित्र तयार करत अनोखे अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** स्वराज्याच्या प्रेरणास्थान राजमाता जिजाऊ यांची आज जयंती आहे. छत्रपती संभाजी नगर शहरातील तरुणांनी जिजामातेला अनोख्या पद्धतीने अभिवादन केलं आहे. एक महिना अगोदरपासून प्लास्टिकच्या बॉटल्स गोळा करत तब्बल १८ हजार बॉटल्स पासून अश्र्वारूढ असा २०० फुटांचा माँ साहेब जिजाऊंचा पुतळा उभारला आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देऊन हा पुतळा उभारल्याचे आयोजकांनी सांगितले. हा पुतळा बघण्यासाठी छत्रपती संभाजीनगर सह मराठवाड्यातून शिवप्रेमी दाखल होत आहेत.



## विविध वृत्त...

### अकोल्यात राजमाता जिजाऊ जयंती निमित्त वंचितकडून बाईक रॅलीचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** आज राजमाता जिजाऊ यांची जयंती आहे. या जयंतीनिमित्त आज वंचित बहुजन आघाडी कडून बाईक रॅली काढण्यात आली होती. तर या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या आणि यावेळी शिवाजी महाराज जिजामाता आणि सावित्रीबाई फुले यांचे वेशभूषा परिधान केलेले मुलेही यावेळी या रॅलीमध्ये होते. तर ही बाईक रॅली अशोक वाटिका येथून सुरू होऊन पोस्ट ऑफिस चौक, बस स्थानक चौक, टॉवर चौक, अग्रेशन चौक मार्गे जिजाऊ हॉल या ठिकाणी या बाईक रॅलीचा समारोप करण्यात आला.

### माजी मंत्री छगन भुजबळ यांनी घेतले श्रींचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री तथा ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांनी आज बुलढाणा जिल्ह्यातील संतनगरी शेगावात पोहोचून श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले आहे. शेगाव येथे सुरू असलेल्या माळी समाजाच्या राज्यस्तरीय उपवर युवक युवती परिचय संमेलनामध्ये सहभागी होण्यासाठी ते शेगावात आले आले होते. त्यांनी श्री संत गजानन महाराजांच्या मंदिरात पोहोचून दर्शन घेतले यावेळी संस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

### जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### बेशिस्त वाहनचालकांना बसणार दणका; अजित पवार म्हणाले, 'पाच हजार रुपये दंड करण्याचा सरकारचा विचार'

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात आणि पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांकडून वाहतुकीचे नियम पळताना दिसून येत नाहीत. या वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या लोकांमुळं वाहतूक कोंडी होते. वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावे तसेच जे लोक वाहतुकीचे नियम पाळणार नाहीत, अश्या लोकांना आता पाच हजार रुपये दंड करण्याचा सरकारचा विचार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. अजित पवार आज पुणे दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी बेशिस्त वाहन चालकांवर कठोर कारवाईचे संकेत दिले.

५ हजार रुपये लावणार दंड : ''दोन दिवसांपूर्वी पुण्यातील सर्किट हाऊस येथे सर्वच अधिकाऱ्यांची बैठक झाली आहे. ही बैठक वाहतुकीच्या संदर्भात होती. अनेक वेळा लोकांकडून वाहतुकीचे नियम पाळले जात नाहीत. अश्या लोकांना दंड जास्त लावला पाहिजे, असं काहींनी लक्षात आणून दिलं. लोकसभेत याबाबत देखील चर्चा झाली. जर ५ हजार दंड लावला तर लोकांना शिस्त लागेल. पण याला कायदा हा सेंट्रल गव्हर्मेंटचा लागतो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ही मानसिकता आहे. वाहतूक कोंडी सुरळीत होण्यासाठी अनेक टोल हे काढले आहेत. तर काही टोल हे पुढच्या काळात काढले देखील जाणार आहे,'' असं अजित पवार म्हणाले.

पुरंदर एअरपोर्टबाबत बैठक : पुण्यातील पुरंदर येथील एअरपोर्टबाबत अजित पवार म्हणाले की, ''पुरंदर एअरपोर्टबाबत बैठक झाली आहे. कुठलाही एखादा प्रकल्प करताना लोकांचा विचार करावा लागतो. पुढील अनेक वर्षाचा विचार करून काम करायला लागणार आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन

# खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे : केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** रस्त्यावरील खाद्यपदार्थ हे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे एक जिवंत उदाहरण असून प्रत्येक वर्गातील व्यक्ती आवडीने खातात. खाद्यप्रेमी अन्न सुरक्षा, स्वच्छता व पौष्टिक पदार्थांना प्राधान्य देत आहे. त्यामुळे खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्र्चिम क्षेत्रमार्फत येथील सहकार विद्या मंदिर शाळेच्या सभागृहात 'संकल्प स्वच्छ आहार' उपक्रमांतर्गत खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्र्चिम क्षेत्राच्या संचालक प्रिती चौधरी, दिल्ली मुख्यालयाचे संचालक डॉ. रविंद्र सिंग, आयुष विभागाचे प्रा. डॉ. योगेश शिंदे, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे सहायक संचालक ज्योती हरणे, स. संचालक अजय खैरनार, निलेश धंदाळे, शुभांगी निकम आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, बुलढाणा जिल्ह्याला धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा वारसा लाभला आहे. या ठिकाणाला अनेक देशी व विदेशी पर्यटक भेटी देतात. त्यांना स्थानिक खाद्यपदार्थांचे मोठे आकर्षण असते. त्यामुळे या खाद्यपदार्थांची मोठी मागणी होत असून स्थानिकांना त्याचा लाभ होतो. पर्यटक अन्न सुरक्षा व स्वच्छतेला प्राधान्य देतात. त्यामुळे प्रत्येक विक्रेत्यांनी स्वच्छता, सुरक्षतेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. प्रशिक्षणामध्ये सांगितलेल्या बाबींचा आपल्या व्यवसायात अवलंब करुन अन्न सुरक्षा मानकाचे पालन करावे. जिल्ह्यातील अनेक खाद्यपदार्थांचे नावलौकीक असून शेगांव कचोरीप्रमाणे नवनवीन प्रयोगातून पदार्थांची ब्रँडींग करावी. खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी शासन अनेक योजना राबवित आहे. स्वनिधी योजनाच्या माध्यमातून अल्प दरात कर्ज उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेचा लाभ घेऊन खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी आपला व्यवसाय मोठा करावा. त्यांनी खाद्यपदार्थ तयार करण्यापर्यंत सिमीत न राहता त्यांचे पॅकींग, मार्केटींग व ब्रँडींगवर भर द्यावा.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाव्दारे देशभरात खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबवित आहे. या प्रशिक्षणाचा जिल्ह्यातील सर्व बचत गट, रस्त्यावरील खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी लाभ घेऊन ग्राहकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध करुन द्यावे. जंक फुडमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे नागरिक पौष्टिक व सात्वीक आहाराला प्राधान्य देत असून केंद्र शासनही आयुष आहाराला प्रोत्साहन देत आहे. आयुष आहारामुळे विविध आजारांपासून बचाव होत असून शारीरिक, मानसिक स्वास्थासाठी आवश्यक आहे. त्यामुळे खाद्यपदार्थ विक्रेते व बचत गटांनी आयुष आहाराला प्राधान्य देऊन जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करुन खाद्यपदार्थ विक्रेतांचे प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यानंतर राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेच पुजन करुन अभिवादन करण्यात आले. प्रशिक्षणाला आलेले विक्रेते व बचत गटातील महिलांना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते सेफ्टी किटचे वाटप करुन उपस्थितांना अन्न सुरक्षा व स्वच्छतेसंदर्भात प्रतिज्ञा दिली.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचे फोस्टॅक प्रशिक्षक डॉ. रामेश्र्वर जाजू व प्रियंका सूर्यवंशी यांनी वैयक्तिक स्वच्छता, सुरक्षित अन्न हाताळणी, अन्न भेसळ आणि अन्न सुरक्षा व स्वच्छता मानके याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण पश्र्चिम क्षेत्राचे संचालक प्रिती चौधरी यांनी केले. तर सूत्रसंचालन सहायक संचालक अजय खैरनार यांनी केले. यावेळी बचत गटाच्या महिला व रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे २००० पेक्षा जास्त विक्रेते सहभागी झाले होते.

### सरकार प्रोटेक्शन मनी घेतंय का? संतोष देशमुख हत्या प्रकरणात संजय राऊतांचा सवाल

**मुंबई/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात दिवसेंदिवस राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरू असून, भाजपा आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणात विविध आरोप केलेत. याच हत्या प्रकरणात मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोपींवर मोक्का लावण्याचे आदेश दिलेत. यावर खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली असून, मुख्य आरोपीला सोडून इतर आरोपींवर कारवाई सुरू असल्याची टीका राऊतांनी केलीय. तर दुसरीकडे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेण्याच्या वाटेवर ठाकरे गट असून, यावरून काँग्रेस आणि शिवसेनेत वाद पाहायला मिळत आहेत.मुख्य आरोपीला सोडलं जातंय : बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाबाबत बोलताना खासदार संजय राऊत म्हणाले की, या राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री बोलतात की, आम्ही कोणालाही सोडणार नाही. पण मुख्य आरोपीला सोडलं जातंय आणि इतर दुसऱ्याच आरोपींना मोक्का लावला जातोय. मुख्य आकाला स्वत:कडे ठेवायचं. यावर आज मी सामनात भाष्य केलंय.

### भाजपला मदत करण्यासाठीच आम्ही उठाव केला, ठाकरेंना भाजप जवळ करणार नाही, गुलाबराव पाटलांचे सूचक वक्तव्य



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजप ठाकरेंच्या शिवसेनेला जवळ करणार नसल्याचे सूचक वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. ठाकरेंची शिवसेना ही भाजपच्या जवळ आली तर आम्हाला काही समस्या नाही. ज्या काळात भाजपला मदतीची गरज होती, त्या काळात त्यांचे विचार सोडून ते गेले. तेव्हा भाजपला मदत करण्यासाठी आम्ही उठाव केला आहे. त्यामुळे भाजप निश्चितच आमचा विचार करेल असेही पाटील म्हणाले.

जो पडतीच्या काळात आपल्यासोबत असतो तोच आपला खरा भाऊ असतो असेही गुलाबराव पाटील म्हणाले. महायुतीचे २३७ आमदार निवडून आले आहेत. २० आमदार त्यांचे आहेत. संजय राऊत यांचा कार्यक्रम संपला असल्याचे गुलाबराव पाटील म्हणाले. त्यामुळं ते भाजपशी जवळीक साधत असले तरी मला असे वाटते की भाजप ठाकरेंच्या सेनेला जवळ करणार नाही असंही गुलाबराव पाटील म्हणाले.

विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मोठा फटका बसला. यानंतर महाविकास आघाडीतील धुसफूस समोर येत आहे. नुकताच काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी महाविकास आघाडीला घरचा आहेर दिला. यानंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी काँग्रेस आणि ठाकरे गटाला टोला लगावला. यामुळे आगामी महापालिकेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र मैदानात उतरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. त्यातच आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणूक स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. दरम्यान, संजय राऊतांच्या या निर्णयानंतर विविध स्तरातून प्रतिक्रिया आल्या आहेत. त्यांच्यावर अनेकांनी टीका देखील केली आहे.

नागपूरपासून मुंबईपर्यत आम्ही स्वबळावर लढणार आहे. एकदा आम्हाला पाहायचे आहेच, जे काही होईल ते होईल, आमचं असं ठरतंय. मुंबई, ठाणे नागपूरमध्ये कार्यकर्त्यांना संधी केव्हा देणार? कार्यकर्त्यांना संधी न दिल्यामुळे पक्ष वाढीला फटका बसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका सर्व पक्षांनी स्वबळावर लढवाव्या आणि आपापल्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी घोषणा त्यांनी केली आहे. संजय राऊत यांच्या घोषणेनंतर आता महाविकास आघाडीतील मित्रपक्ष नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी अक्षय अचित जाधव याची ८६ किलो वजनी गटात निवड



दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** खामगाव येथे महाराष्ट्र केसरी या स्पर्धेची दरवर्षी चाचणी होत असते. या चाचणी मध्ये जिल्ह्यातील सर्व कुस्ती खेळणारे पैलवान सहभागी होत असतात. कारण या ठिकाणाहून थेट निवड ही महाराष्ट्र केसरी साठी होत असते. त्याचा अनुषंगाने सोयंदेव येथील पैलवान अक्षय अचित जाधव याची महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी ८६ किलो वजनी गटात निवड झालेली आहे.

अक्षय च्या बाबतीत सांगायचं झालं म्हणजे त्याचे वडील अचित राव जाधव हे देखील चांगले ताकदीचे पैलवान होते त्यांनी देखील बरेच आखाडे गाजवलेले आहेत. व आपल्या मुलाने देखील एक दिवस महाराष्ट्र केसरी व्हावे ही त्यांची अतोनात इच्छा आहे. त्याचा अनुषंगाने अक्षय देखील आपला खेळ सांभाळत आहे आणि सर्व जिल्ह्याला अभिमान वाटेल असा पराक्रम त्याने करून दाखवलेला आहे. आता होणाऱ्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी अक्षय ची निवड झालेली आहे. परिसरातील सर्व स्तरावरून अक्षय चे कौतुक होत आहे.

**गेल्या अनेक वर्षापासून कुस्ती खेळत आहे. मला हा खेळ अतिशय प्रिय आहे आणि माझे स्वप्न आहे की एक दिवस मी महाराष्ट्र केसरी बनणार आहे. त्यासाठी हवे ते प्रयत्न करण्यासाठी मी सज्ज आहे. कारण मला माझ्या वडिलांचे व भावाचे आईचे व संपूर्ण जिल्ह्याचे नाव रोशन करायचे आहे. आणि महाराष्ट्र केसरीचा गदा माझ्या जन्मभूमीतील सोयंदेव या गावातील गावकऱ्यांना समर्पित करायचा आहे .**

# बीबी येथे जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** बीबी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मासाहेब जिजाऊ जयंती १२ जानेवारी रोजी उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी बीबी येथील बस स्थानक परिसरात भव्य स्टेज सजावट तयार करून मासाहेब जिजाऊंचा फोटो लावण्यात आला. सर्वप्रथम जिजाऊंचा वेश परिधान करून जिल्हा परिषद शाळेतील मुला, मुलींच्या उपस्थितीत बीबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप पाटील व ग्रामस्थ मान्यवर यांच्या उपस्थितीत मा जिजाऊंच्या फोटो प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी लहान मुला मुलींनी जिजाऊंच्या जीवन चरित्रावर देशभक्तीपर गीत सादर केली व भाषणे देऊन विद्यार्थ्यांनी जिजाऊंच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून अभिवादन केले. यावेळी डॉ. नितीन सानप, डॉ. वाघ, दगडूबा गायकी, डॉ.काकड, विवेक बंगाळे, सतीश मुळे, डॉक्टर ,मेडिकल असोशियन ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, बँक कर्मचारी, महावितरण , व्यापारी वर्ग ग्रामस्थ आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

